
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५४ वे, अंक १ला, मुंबई । मार्च २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 54, Issue : 1, Mumbai I March 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ
## महिला दिन सोहळा - २०२३







देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५४वे, अंक १ला,
मार्च २०२३
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह


**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
**मो. : ९८६७९९४३८९**

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**


**दूरध्वनी** : २४३०२२७३, २४३०७५७३
**ई–मेल** : aadrbm@gmail.com
**संकेतस्थळ** : www.adrbmmahim.in


## राष्ट्रीय परिषदेतर्फे अध्यक्ष श्री विलास वि. जोशी यांना जीवन गौरव पुरस्कार




आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ रोजी डोंबिवली येथे झालेल्या बीबीएनजी राष्ट्रीय परिषदेत माननीय श्री विलासराव जोशी (अध्यक्ष: देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, ठाणे /अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ) यांना जीवन गौरव पुरस्काराने माननीय उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, अध्यक्ष श्री श्रीपादराव कुलकर्णी व श्री मुकुंदराव कुलकर्णी यांच्या उपस्थितीत गौरवण्यात आले.

## अभिनंदन रोहिणीताई !!!



अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ परिषदेच्या सचिव, संस्थापक अध्यक्षा, राणी लक्ष्मीबाई महिला विकास प्रबोधन प्रतिष्ठान, राणी लक्ष्मीबाई मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह, रमाबाई अपंग प्रशिक्षण केंद्र, रमाबाई अपंग निवासी कार्यशाळा, जनकल्याण हॉस्पिटल सोलापूर संचालिका, सोलापूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या संस्थापक सदस्या, सोलापूर जिल्हा अनुदानित वस्तीगृह या संघटनेच्या खजिनदार, सोलापूर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती अध्यक्षा सोलापूर महानगरपालिका मा. विरोधी पक्षनेत्या, सोलापूर जिल्हा नियोजन समिती मा. सदस्या, आदरणीय **रोहिणी रामचंद्र तडवळकर** (बी.कॉम., डी.वी.एम., डी.एड.एच.आय, एम.एस.डब्ल्यू.) यांना अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने सत्यशोधक मुक्ता साळवे **समाज भुषण पुरस्कार** २०२३ ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माननीय श्री डॉक्टर बाबा आढाव यांच्या शुभहस्ते डॉक्टर श्री प्रशांत नारनवरे, समाज कल्याण आयुक्त महाराष्ट्र राज्य व श्री नारायणजी डोलारी सामाजिक कार्यकर्ते यांच्या प्रमुख उपस्थितीत गणेश हॉल, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे येथे प्रदान करण्यात आला. रोहिणीताई खूप खूप अभिनंदन. पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर विद्यापिठ सोलापूरच्या सिनेटपदीही २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी राज्यपाल नियुक्त सदस्या म्हणून सौ.रोहिणी रामचंद्र तडवळकर यांची नेमणुक झाल्याबद्दल खूप खूप अभिनंदन आणि पुढील जबाबदारीत शुभेच्छा. रोहिणीताई आगे बढो....


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire



*With*
*Best*
*Compliments*
*From*

S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

# श्री समर्थांच्या मते आहार कसा असावा?

**स. भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

आपण जे खातो तसे आपण बनतो असे म्हणतात. आपल्या शरीराचे पोषण हे अन्नानेच होते. आपल्या शरीराच्या पेशी या अन्नातील घटकांपासूनच बनतात. अन्नातील जीवनसत्वांपासूनच आपल्या शरीराचे रक्षण बनते आणि मांसाची वाढ होते. आपली हाडे सुद्धा अन्नातील घटकांपासूनच मजबूत बनतात.

तसेच आपल्या पोटाचा व मेंदूचा संबंध असतो हेही आपण जाणतो. आपण तणावात असताना आपले पचन बिघडते आणि आपण छान जेवलेलो असलो तर आपला मूड मस्त असतो असे आपण अनुभवलेले असेलच. या सर्व गोष्टी श्री समर्थांनी खूप आधीच लिहून ठेवल्या आहेत. जसे की या ओव्या पाहा या समर्थ रामदास स्वामींच्या 'स्वयंपाकिणी' या स्फूट समासातील आहेत. समर्थ रामदास हे असे संत आहेत की, ज्यांनी जीवनातील प्रत्येक गोष्टींवर मार्गदर्शन केले आहे.

आता ऐका स्वयंपाकिणी । बहुत नेटक्या सुगरणी ।अचूक जयांची करणी । नेमस्त दीक्षा ।।

स्वयंपाक करणारी किंवा करणारा हा त्यात निपुण असावा. त्यांची स्वयंपाक बनवण्याची पद्धत अचूक असावी व सर्व पदार्थांचे प्रमाण योग्य असावे. तसेच

स्वयंपाक करताना पदार्थ नीट करावे ते कसे असावेत -

गोड स्वादिष्ट रुचिकर । येकाहून येक तत्पर । न्यून पूर्णाचा विचार । कदापि न घडे ।।

खाताना गोड लागेल, चविष्ट वाटेल असा स्वयंपाक असावा. स्वयंपाकात काही कमतरता असेल तर ती तत्परतेने पूर्ण केली जावी व कुठलीही कमतरता असू नये. घरात होणारा स्वयंपाक हा घरातील सर्व व्यक्तींना योग्य अशा प्रकारचा असला पाहिजे.

रोगी अत्यंत खंगले । तेणे ते अन्न पाहिजे भक्षिले । भोजन रुचीने गेले । दुखणे तयाचे ।।

अत्यंत आजारी असलेल्या व्यक्तींना खाण्यास उत्तम वाटेल असे अन्न सुगरणीने करावे जेणे करून ते अन्न खाल्ल्याने त्याचे दुखणेही बरे होईल.

उत्तम अन्ने निर्माण केली । नेणो अमृते घोळिली । अगत्य पाहिजे भक्षिली । ब्रह्मादिप्ती।।

स्वयंपाक असा असावा की, जणुकाही त्यात अमृतच टाकले आहे असे वाटावे. देवांनाही आवडेल असा रुचकर स्वयंपाक करणे हे सुगरणीचे काम असते.

सुवासेची निवती प्राण । तृप्त चक्षू आणि घ्राण । कोठून आणिले गोडपण । काही कळेना ।।

स्वयंपाकाच्या नुसत्या वासाने अंतःकरण आनंदित झाले पाहिजे. नाक आणि डोळे तृप्त झाले पाहिजेत. बनवलेल्या पदार्थांची चव अशी असावी की खाणार्यालाही प्रश्न पडला पाहिजे. याचे नेहमी पाहत असलेले उदाहरण म्हणजे महाप्रसादाचे जेवण होय. काही विशेष न टाकताही देवासाठी आत्मीयतेने केल्यामुळे महाप्रसादाचा स्वयंपाक अप्रतिमच होतो. घरी कितीही मसाले घालूनही तसा स्वयंपाक होत नाही.

उत्तम स्वयंपाक केला की सर्वप्रथम तो देवाला नैवेद्य म्हणून दाखवावा.

देव वासाचा भोक्ता । सुवासेचि होये तृप्तता । येरवी त्या समर्था । काय द्यावे ।।

देवाला आपण नैवेद्य दाखवितो. देव फक्त वासानेच तृप्त होतो. आपली कृतज्ञता त्यातून दिसते. देवाला नैवेद्य दाखविल्यानंतरच बाकीच्यांना जेवावयास वाढावे. जेवताना देवाचे नामस्मरण करावे.

जनी भोजनी नाम वाचे वदावे । अति आदरे गद्यघोषे म्हणावे ।
हरीचिंतने अन्न सेवीत जावे । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ।।

अशा प्रकारे गृहिणीने स्वयंपाक केला तर सर्व कुटुंबाचे आरोग्य उत्तम राहील. सुदृढ कुटुंब व सुदृढ समाज निर्माण होईल. अशा या स्वयंपाकाची फलश्रुती समर्थ सांगतात -

भव्य स्वयंपाक उत्तम । भोजनकर्ते उत्तमोत्तम । दास म्हणे भोक्ता राम । जगदांतरे ।।

अशाप्रकारे केलेले मिष्टान्न चवीने ग्रहण करणारे लोक तृप्त झाले म्हणजे श्रीरामच संतोष पावतात कारण श्रीरामच सर्वांच्या अंतरी असतात.

## गृहिणीची महती

**सौ. सुनिता रोझेकर** (मो. : ९८६७४६७९२५)

**न गृहं गृहमित्यार्गृहिणी गृहमुच्यते। गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते।।**

म्हणजेच गृहिणी शिवाय घराला शोभा नाही, घराला घरपण नाही. ती शुचिता, शुद्धता देते. सद्‌गुणी गृहिणी... गृहिणीविना त्या घराला घर का म्हणावे? त्याहून अरण्य सुखदायी ठरेल... स्त्री ही गृहिणीपण सांभाळताना अनेक भूमिका निभावते. ती सुग्रास भोजन तयार करून कुटुंबातील व्यक्तींचे उत्तम पोषण करत असते. गृहिणींच्या कामामुळे कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला हातभार लागतो. देशाच्या अर्थव्यवस्थेतही त्यांचं योगदान मोठं आहे. ती तीन वर्गांना सेवा देत असते. पहिला वर्ग जेष्ठ नागरिक, जे देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देऊन निवृत्त झालेले असतात, दुसरा वर्ग तरुणांचा, जे जीडीपी मध्ये हातभार लावतात. तिसरा वर्ग असतो बालकांचा. जे देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणार. तांत्रिक भाषेत त्याला ॲबस्ट्रॅक्ट लेबर असे म्हणतात. अशी ही अन्नपूर्णा, गृहलक्ष्मी, लक्ष्मी पण वेळप्रसंगी आपली साठवलेली पूंजी काढते.

भारतीय संस्कृतीत स्त्री ला पूर्वीपासूनच सन्मान दिला आहे. सुवासिनी आणि कुमारिकांचा धार्मिक विधीत, यथोचित आदरपूर्वक सन्मान केला जातो. तो याचसाठी की, प्रत्येक स्त्री च्या अंतर्यामी एक सुप्त शक्ती वास करते. ती उर्जा तिला जन्मजातच मिळालेली असते आणि दुर्गेचा सूक्ष्म अंश तिच्यामध्ये आहे. धरतीप्रमाणे सोशिक, समंजस, धीरगंभीर आहे, धरा आणि स्त्री मध्ये एक महत्त्वपूर्ण साधर्म्य आहे, ते म्हणजे जननक्षमता धरती सर्व निर्माण करते, तर स्त्री ही आपल्या कुटुंबाचा वंश वाढवते. म्हणून ती कुटुंबाचा आधार आहे. ती संस्कृती, परंपरेला पुढे नेते. हेच तिचे आद्य कर्तव्य आहे. या देशात प्राचीन काळापासून स्त्री ला समान अधिकार दिले जात होते, गार्गी, मैत्रेयी या स्त्रीयांना किवाडामागून शास्त्रार्थ सांगण्यास अनुमती मिळाली.

स्त्री सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने हुशार आहे. तिला अधिकार देण्यात यावा, असे सांगण्यात आले. एवढेच नव्हे तर, वैदर्भीय कन्या लोपामुद्रा हिच्याशी अगस्ती ऋषींनी विवाह करून, तिच्या मागण्यांसाठी काही काळ कष्ट, त्याग करावे लागले. विंध्याचलाचा दर्प भंग करणारे महर्षी होते ते. त्यांना आपण ललितास्वरुपिणी असून आपणही शिव स्वरुप व्हावे असे सांगितले, त्याचे पालनही त्यांनी केले. अशा असंख्य कथा या संस्कृतीत आहेत. स्त्री घराचा आधारस्तंभ आहे, असे यासाठीच म्हंटले जाते, ते सोशिक, सहनशील, आहे. ईश्वराने असे का घडवले, कारण ती प्रसववेदना सहन करून, कुलापत्य प्राप्त करून देते. प्रसूती हा तिचा पुनर्जन्मच आहे. इथे सोशिकपणा दिसून येते.

**यत्र नार्यस्तु पूज्यंते। रमन्ते तत्र देवताः।।**

ज्या ठिकाणी स्त्रीचा आदर, सन्मान केला जातो, त्या ठिकाणी प्रत्यक्ष देवताच वास करतात. तर जिथे तिची उपेक्षा, अवहेलना केली जाते, तिथे दैवी कोप, रोष ओढवला जातो. ती ही गृहलक्ष्मीच आहे. तिच्या भाळी असलेला, कुंकवाचा टिळा ही तिच्या सकारात्मक उर्जेचे प्रतीक आहे. तीच उर्जा संकट व कठीण प्रसंगी अंतःप्रेरणेने घराला तारून नेते. मनगटावरील कंकणाकृती कांकण म्हणजे बांगडी ही सामर्थ्य, धारिष्ट्य दाखवून देते.

समाजात बोलण्याचा प्रघात आहे. बांगड्या भरा, हे उपहासाने बोलणे आहे. वेळप्रसंगी ती एकाचे दोन हात करायला कमी करणार नाही. रस्त्यावर नेहमी आईवरून अश्लील भाषा वापरली जाते. वाईट वाटते. याला कुठेतरी आळा बसला पाहिजे.

आजकाल दूरदर्शनवर मालिकांमध्ये स्त्रीचीच शस्त्रू स्त्री, खलनायिका अमानूष छळ करताना दाखवले जाते. हे घराघरातील वातावरण बिघडवण्याचे लक्षण आहे. समाजमनावर, पुढील पिढीवर याचा विपरीत परिणाम होईल, याचा विचारच केला जात नाही. पणजी, आजी नेही कौटुंबिक जबाबदारी उत्तम पार पाडली, आई/सासू ने आपले करिअर उत्तम सांभाळून, प्रापंचिक जबाबदारी तसेच मुलांसाठी खाल्लेल्या खस्ता, संघर्ष, या गोष्टी दाखवल्या तर पुढील पिढीवर वेगळा परिणाम दिसून येऊ शकेल.

आठ मार्च जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून अनेक चांगल्या गोष्टींचे, कार्यक्रमाचे आयोजन करत, नव्या-जून्या पिढीचे एकत्रीकरण केले तर चांगलेच.. नव्या-जुन्या गोष्टी, विचार, तत्त्व यांचा समन्वय साधला गेला तर खूपच उत्तम. संस्कृतीची समृद्ध, संपन्न परंपरा जपली जावी, प्रत्येक स्त्रीकडून आपापल्या परीने प्रयत्न केला जावा, असे वाटते.

जागितिक महिला दिनाच्या अनेकानेक हार्दिक शुभेच्छा.

# सखी राज्ञी

**डॉ. तरुजा भोसले- वळसंगकर** (मो. : ९५६१०९३८३८)

आज इतक्या वर्षानंतरही पुन्हा महिलांच्या शिक्षण, आरोग्य आणि जीवनाच्या असुरक्षिततेबद्दल बोलावे लागतेय हे दुर्दैव आहे. हल्लीच दूरदर्शनवरची बातमी पहाताना जीव गलबलून आला होता. आपल्या चार मुलांपैकी कमीत कमी दोघांना तरी लिहीता वाचता यावे म्हणून बिचाऱ्या गरीब वडीलांनी झाडाच्या ओंडक्यापासून एक तराफा बनवला होता आणि ते दररोज धरणाच्या पाण्यातून आपल्या मुलींना पलीकडच्या गावातल्या शाळेत पोहोचवत होते. जेमतेम पाण्यावर तरंगणारा लाकडी तराफा आणि गणवेशात बसलेल्या चिमुकल्या. जीवघेणा प्रवास या मुली दररोज केवळ शिक्षणाच्या ओढीने करत आहेत. या मुलींनी मुलाखतीत सांगितले की, तराफा कलंडला आणि आम्ही पाण्यात पडलो तर वाचण्यासाठी हाती काहीच नाही. एवढ्या कठोर तपस्येनंतर या मुलींच्या भविष्यात काय असेल याचा विचार करताना फारसे आशादायक चित्र नाही काढता आले. कारण वस्तुस्थिती तशी आहे.परंपरागत विचारांनी गरीबांचे जीवन तर व्यापले आहेच; पण श्रीमंतांच्या घरीही 'हमारे उसूल' या सदराखाली अकल्याणकारी गोष्टींचे स्तोम माजले आहे. मग आत्ताही पाण्यात पडून बुडण्याची भीती असलेली ही मुलगी पुढे भीतीच्या सावटाखालीच जगणार असेल तर हा प्रश्न कसा सोडवायचा?

महाभारतात यक्षाने युधिष्ठीराला विचारलेल्या प्रश्नांमध्ये एक प्रश्न असा होता की, देवाने पुरुषांसाठी निर्माण केलेला उत्तम मित्र कोण?

युधिष्ठीराने उत्तर दिले होते, त्याची पत्नी. हजारो वर्षांपूर्वी दिलेले हे उत्तर आजच्या काळातही सर्वमान्य आहे.आपल्यापैकी अनेकांनी महाभारत वाचले आहे; यक्षाने विचारलेले प्रश्नही माहीत आहेत; तर मग उत्तर नको का आचरणात आणायला? उत्तम मार्गदर्शक असलेल्या महाभारतातले युधिष्ठीराचे हे उत्तर आपल्या सर्वांच्या कल्याणाचे आहे.

कौटुंबिक नात्यात मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होऊ शकतात. किंबहुना ते झाले पाहिजेत.तसे झाले तर मोकळेपणाने चर्चा होते, समस्यांवर तोडगा काढला जातो आणि विश्वासार्हता वाढून कौटुंबिक एकोपा निर्माण होतो. नात्यातली जाचक बंधने, दडपण, फाजील अपेक्षांचे ओझे दूर झाले की मनाचे आकाश निरभ्र होऊन प्रगतीचे पंख झेपावतात जे राष्ट्राच्या कल्याणात हातभार लावत असतात.

छ.संभाजीराजे युवराज झाल्यावर त्यांनी आपली पत्नी येसूबाई यांना लिहीलेल्या पत्रात सखी राज्ञी जयतु येसूबाई! असे उदात्त शब्द वापरले आहेत. येसुबाईंना ही अधिकाराची मोहर दिली होती.पुढे हीच राजमुद्रा झाली आणि कुलमुखत्यार पद देऊन पुढे त्यांना शिक्केकट्यारीचा मानही देण्यात आला.

युवराज झालेले संभाजी किती उदात्त विचार करतात; त्यांचे पाईक झालेले आपण नुसत्याच घोषणा देत आहोत.

महाराष्ट्र शिल्पकार यशवंतराव चव्हाण आणि वेणूताई यांचे नाते मैत्रीपूर्ण होते हे त्यांची पत्रे वाचून समजते. अशा नात्यातून स्वर्गीय आनंदाची निर्मिती त्यांनी दुसऱ्यांसाठीही केली.

पतीमध्ये परमेश्वर शोधण्याची कल्पना भयावह आहे.एखाद्या मनुष्याशी विवाह झाल्यावर त्याचा परमेश्वर कसा होईल ? विवाहाने आपण जीवनसाथी शोधतो. त्याचा परमेश्वर केल्याने अकारण व्यक्तीपूजा सुरू होते आणि त्यातूनच स्वामित्त्वाची भावना वाढीस लागते. पुढे दहशतवादी वृत्ती फोफावते ज्याला बांध घालता येत नाही. विवाहसंस्कार पतीपत्नीला सन्मान, स्वातंत्र्य,समानतेचे अधिकार अग्नीच्या साक्षीने देतात. पतीला परमेश्वर मानून त्याच्या आज्ञेत रहाणे म्हणजे आदरापेक्षा गुलामी ठरते. व्यक्तिस्वातंत्र्याला बाध येतो. म्हणून ही कौटुंबिक गुलामी दूर होणे गरजेचे आहे.

यासाठी घटनेचा अभ्यास करणे गरजेचे आहे.घटनेच्या मूलभूत अधिकारातलं कलम २१ सांगतं की कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही. हे एकच कलम एवढं महत्त्वाचं आहे की ते काढून टाकलं तर संपूर्ण घटनाच निष्प्रभ होईल.

या ८ मार्चनिमित्त याचं परिशीलन होईल का?

## रंग होळीचा

**सौ शुभदा कुलकर्णी** **(मो. : ९३२४९७८१५७)**

दुरदर्शनवर होळीगीते चालू होती. मला लहानपणीची होळी आठवली.

होळी रे होळी पुरणाची पोळी होळी म्हटले की मला प्रथम पुरणाची पोळीच आठवते. रंग नंतर आठवतात !कारण आमच्या लहानपणी अशी होळीला रंग खेळायची मुळी पद्धतच नव्हती. आमचं तेव्हाचं गाव म्हणजे

तालुक्याची जागा असली तरी खेडे होते.

घरासमोर चौकात होळी रचलेली असायची. आदल्या दिवशी पासूनच तयारी सुरू व्हायची. आम्ही भावंडे पण त्यात सामील व्हायचो. मग कुठून कुठून काय मोडके सामान बाहेर पडलेले असेल तर ते लाकडी सामान, गोर्वऱ्या, काटक्या आम्ही गोळा करायचो आणि होळी रचली जायची.

तोपर्यंत घराघरांतून पुरणपोळीचा खमंग वास येत असायचा. मग आजूबाजूच्या बायका येऊन रांगोळी काढायच्या. होळीला हार घालायच्या. होळी पेटवली की मग पूजा करायच्या आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवायच्या.. आई पण ताटातून आमचा नैवेद्य आणून पूजा करून आम्हाला नमस्कार व प्रदक्षिणा घालायला सांगून नैवेद्य दाखवत असे. मग होळीत नारळ टाकायचे. मुलांचा आरडाओरडा चालायचा आणि मग भाजलेले नारळ काढायचा एकच दंगा चालू असायचा. गरम गरम खोबरे खात असतानाच पुरणपोळीचे वेध लागायचे आणि घरात जाऊन कधी एकदा तुपात भिजणाऱ्या पोळीवर ताव मारतोय् असं व्हायचं!

दुसऱ्या दिवशी धुळवड असायची. होळीच्या राखेत पाणी घालून त्याचे गोळे करून पुरुष मंडळी आणि मुलं एकमेकांच्या अंगावर ती टाकत असत. इथे आम्हा मुलींचा सहभाग नसे.

खरी मजा यायची ती रंगपंचमीला!

त्यादिवशी आम्हाला शाळेला सुट्टी असायची आणि सकाळपासून रंग तयार करायच्या मागे आम्ही असायचो. हळद आणि बिट्टीच्या फुलांचा रस एकत्र करून पिवळा रंग तयार व्हायचा.कुंकवापासून लाल रंग, बिटाचा जांभळा रंग, पारिजातकाच्या फुलांपासून केशरी रंग केला जायचा. नीळ बादलीभर पाण्यात घालून निळा रंग केला जायचा असे सर्व नैसर्गिक रंग असायचे त्यावेळी आजच्यासारखे रासायनिक रंग नव्हते.

भरपूर खेळून झाले, एकमेकांच्या अंगावर पिचकारीने रंगमिश्रित पाणी उडवलेत्यांत भिजून चिंब झालो, 'अगदी रंगात रंगला श्रीरंग' अशी अवस्था झाली की मग दुपारी घरी येऊन गरम पाण्याने डोक्यावरून आंघोळी होत आणि रंगपंचमी म्हणून आईने केलेली खीर, भजी खाऊन बैठे खेळ चालू व्हायचे. एका मैत्रिणीकडे खंडोबाची तळी भरण्याचा कुळधर्म असे आणि नैवेद्याला पुरण पोळी केली जायची. ती पुरणपोळी पण आमच्याकडे पाठवलेली असायची आणि आम्ही पुन्हा पुरणपोळीवर ताव मारत असू

आता मात्र होळीचे स्वरूपच बदलले आहे. शहरात रंगपंचमी तर कोणाला माहीतच नाही.

उत्तर प्रदेशातील होळीच्या दिवशी रंग खेळण्याची प्रथा आता सर्वांनी अंगीकारली आहे. त्यामुळे होळीच्या दिवशीच विविध रंग वापरून देशभर होळी साजरी केली जात आहे.या रासायनिक रंगांमुळे चेहऱ्याला अलर्जी होते. डोळ्यात रंग गेल्यामुळे डोळ्यांना इजा होते. कित्येकदा सोनेरी चंदेरी धातुंपासून बनवलेले चकाकते रंग चेहऱ्याला लावतात यामुळे दुसऱ्या दिवशीसुद्धा तो रंग निघत नाही आणि खरवडून काढताना चेहऱ्याची त्वचा खराब होते पण खेळायच्या नादात आरोग्याची हानी लक्षात कोण घेतो?

त्यामुळे आता होळी आणि रंग असं समीकरणच तयार झाले आहे.

हा होळीचा रंगोत्सव निसर्गही साजरा करत असतो. हिरव्या रंगाच्या अनेक छटा पानांमधून झळकत असतात चाफ्याची पांढरी फुलं, मोतिया रंगाचा मोगरा आणि विविध रंगांची सदाफुली, अग्निसारखी लाल भडक पलाश-पुष्पे, सोनेरी रंगाची सुगंधी सोनचाफ्याची फुलं तसेच फाल्स अशोकाची (म्हणजे पॉलिथिया लाँगीफोलिया), आंब्याच्या पानांसारखी दिसणारी हिरवी पाने आता गुलाबी रंगाची कोवळी पानं झालेली असतात. वातावरण सुगंधी झालेले असते. या इन्द्रधनुष्याच्या सर्व रंगानी नटलेलं निसर्गाचं रूप कृष्णमय झालेले असतं

हा रंगांचा उत्सव म्हटलं की मला विविध रंगानी नटलेली मथुरेला पाहिलेली होळी आठवते. राधाकृष्णाना

घातलेले विविध रंगांचे कपडे, फुलांचे सुंदर दागिने, घरोघरी होणाऱ्या कृष्णमूर्तींच्या सजावटी आणि मथुरा, वृंदावनमध्ये सुरू असलेला कृष्ण नामाचा आणि रंगांचा जल्लोष! सारे वातावरण रंगमय आणि भक्तिमय झालेले असते. सगळेजण देहभान विसरून कृष्ण –नामात आणि रंगात रंगून जाऊन नाचत असतात.

हा रंगांचा व भक्तिचा सोहळा पाहूनच आपल्या अंगात नवी ऊर्जा येतेच आणि हृदयात भक्तीरसाच्या तारा छेडल्या जातात.ते दृश्य डोळ्यासमोर आलं की मला कुमारांची सोहनी रागातील बंदिश आठवते.

रंगात भिजलेली मोहक राधा कृष्णाला हात जोडून विनवणी करतेय –

रंग ना डारो शाम जी
श्याम जी रंग ना डारो
गोरी पर रंग ना डारो
बैरी लाये ये नयी सारी
सखी सहेली हसी करी
कैसे हो खिलारी
मानत नाही बरजोरी
ना करो
जाओ मै तो हारी शाम जी
रंग ना डारो शाम जी

सगुणाने निर्गुणाची केलेली ही मधुर विनवणी ऐकून अवघा देह निर्मळ प्रेमरंगात व भक्तीरंगात भिजून जातो आणि अंतर्यामी द्वैताची होळी सुरू होते

## अहिल्याबाई होळकर

**सौ. पद्मा मांडवगणे (मो. : ७२६३९५४६१४)**

भारतीय संस्कृती ही स्त्री शक्तीची उपासक आहे. शक्ती म्हणजे बलवान शरीर नव्हे. मनाच्या पावित्र्याची, ज्ञानाची, तांत्रिक कौशल्याची, ध्येयवादी वृत्तीची अशा विविध शक्तीची रुपे आपल्याला विविध कालखंडात आढळून येतात. स्त्रीत्वाचा प्रत्येक पैलू हे तिचचं रुप. कधी ती रणरागिणी तर कधी शांत स्वरुपीणी. कधी शिवाची पार्वती तर कधी गुणांची माता. कधी अन्नपूर्णा तर कधी फक्त सावली. शक्तीच्या ह्या विविध स्वरुपाचं आपल्याला दर्शन घडत, आणि त्यांच्या दिव्यत्वाची, महानतेची, कर्तृत्वाची जाणीव होते. अशीच एक स्त्री जीने आपल्या कर्तृत्वाने जनमानसावर आपला पगडा बसवला ती म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर.

मराठवाड्यातील बीड तालुक्यातील ह्या लहानशा गावात माणकोजी व सुशिलाबाई शिंदे ह्याची कन्या अहिल्या लहानपणापासून अत्यंत हुशार व धाडसी तशी धार्मिकही. दहा वर्षाची असतांना नदीकाठी वाळूत अहिल्या शिवपिंड तयार करत होती. अचानक घोडेश्वार वेगाने धावत आले. नदीकाठचे लोक ओरडू लागले. अहिल्या पळ परंतु ती पळाली नाही. त्या पींडीच्या रक्षणासाठी त्यावर पालथी पडली. त्याचवेळी तिथे बाजीराव पेशवा व त्याचे सुभेदार मल्हारराव होळकर आले व पेशव्यांनी थोड्या रागातच विचारलं. मग तू पळत का गेली नाहीस? घोड्याच्या टापेखाली चिरडली गेली असतीस. मोठ्या बाणेदारपणे ती उत्तरली मी वाळूची शिवपींड तयार केली होती. तिचे रक्षण करण्यासाठी थांबले. पेशवे खूष झाले आणि मल्हारावांना म्हणाले की,

ही मुलगी चुणचुणीत, हुशार व चांगली आहे. तिला तुम्ही सून करून घ्या. मल्हारराव हे मध्यप्रदेशातील इन्दौर हे स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्थानचे सुभेदार. त्यांचे कर्तृत्व पाहून पेशव्यांनी त्यांना माळव्याची सुभेदारी दिली. त्यांनी पुढे इन्दौर हे संस्थान स्थापन केले. वंशपरंपरेने सुभेदार की त्यांच्या घराण्याकडे चालुन आली. संस्थान स्थापन झाल्यापासून दोनशे वर्षात राजप्रमुख होण्याचा मान फक्त एका स्त्रीला मिळाला ती भाग्यवान आणि कर्तबगार स्त्री म्हणजे अहिल्याबाई.

बाजीराव पेशव्यांच्या सांगण्यावरून मल्हारराव आणि गौतमाबाई ह्यांचा पुत्र खंडेराव ह्याच्याशी तिचे लग्न झाले. सोनपावलांनी शिंदेच्या अहिल्येने होळकर वाड्यात प्रवेश केला. तेव्हापासून संस्थानाची भरभराट झाली. खंडेरावाला राज्यकारभाची मुळीच आवड नव्हती. ते विलासी, व्यसनी होते. तेव्हा मल्हाररावांनी अहिल्याबाईंना राज्यकारभाराचे शिक्षण दिले. धडे दिले. त्या हुशार असल्यामुळे थोड्याच काळात त्यांनी सर्व आत्मसात केले. तिच्या कामामुळे अहिल्याबाईंनी सासऱ्याचा विश्वास संपादन केला. मल्हारराव लढाईवर गेले असता करवसुली करणे, फौजेकडे लक्ष देणे, नोकर–चाकरांना सांभाळणे, ह्या सर्व गोष्टी समर्थपणे सांभाळल्या. मल्हारराव त्यांचे केवळ सासरेच नव्हते तर मार्गदर्शक गुरू व आधारस्तंभ होते.

अहिल्याबाईने जितके कष्ट आणि आपल्या जवळच्या नातलगाच्या निधनाचे दुःख भोगले तेवढे जगाच्या इतिहासात क्वचित कुणाच्या वाट्याला आले असतील. वयाच्या तीसाव्या वर्षाला त्यांना वैधव्य प्राप्त झाले. पतिच्या निधनानंतर अलंकाराशिवाय पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून पांढऱ्या घोड्यावर बसून त्यांनी सुभेदारीचा कारभार अठ्ठावीस वर्षे कार्यक्षमतेने सांभाळला. अहिल्याबाई धर्मनीष्ठ होत्या. लहानपणापासून त्यांचे वागणे धर्माला अनुसरून होते. त्या एक कुशल प्रशासक होत्या. हिशेबाच्या त्या अत्यंत चोख होत्या. तसेच न्यायाच्या बाबतीतही. धर्मनीष्ठ अत्यंत निःस्वार्थ बुद्धीने कारभार केला. त्या अत्यंत मूत्सदी होत्या. जनहिताचा तर त्यांनी तसाच वसाच घेतला होता. त्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचले अस म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

त्यांचा पुत्र भालेराव यांच्या निधनानंतर काही अंतर्गत शतूंनी सुभेदारी बळकावण्याचा प्रयत्न केला. त्या अत्यंत खचल्या असाव्यात आणि त्यांची सुभेदारीची दौलत ताब्यात घेण्यासाठी योग्य वेळ असल्याचा संदेश देवून तात्या चंद्रचूड ह्यांनी राघोबादादांस आक्रमण करण्यास उद्युक्त केले. अत्यंत दुःखात असूनही अहिल्यादेवींनी राजधर्माच कर्तव्यपालन केले. अत्यंत तातडीने हालचाल करत अहिल्याबाईंनी त्यांचे सैन्य एकत्र केले. त्यात स्त्री सैन्यही होते. कर्तबगार आणि योद्धे तुकोजीरावांना मोठ्या सैन्यासह लढण्यासाठी उद्युक्त केले. थोड्या अवधीत मोठी सेना संघटित केली. जय्यत तयारी केली. राघोबांना त्यांनी सुनावल की त्या जरी लढाईत हरल्या तरी त्यांची किर्तीच वाढेल. पण मांझे सैन्य, स्त्री सैन्य ह्यांनी आपला पराभव केला तर आपली मोठी नामुष्कीच होईल. मी स्त्री असले तरी अबला नाही तर सबला आहे. तीर्थ स्नानाच्या ठिकाणी देवळे, घाट बांधले. पाणपोई, धर्मशाळा, विहीरी उभारल्या. काशी विश्वेश्वराचा जीर्णोद्धार केला. जेजूरीचे मार्तंड मंदीर बांधले. चौंडी चापड गावचे महादेव मंदीर बांधले. कौटुंबिक जीवनात सर्व प्रसंगांनी, त्यांनी जीवन होरपळले तरी प्रजेच्या हितासाठी, सुखासाठी त्या शेवटपर्यंत झिजल्या. शिल्पकलेला उत्तेजन दिले.

अनेक वीरांनी, शाहीरांनी त्यांच्या कर्तृत्वाचे गोडवे गाईले. शाहीर प्रभाकर त्यांची थोरवी गातांना वर्णन करतात.

**सती धन्यधन्य कलीयुगी अहिल्याबाई गेली कीर्ती करुनिया भूमंडलाच्या ठायी।**
**महाराज अहिल्याबाई पुण्यप्राणी। संपूर्ण स्त्रीयामधी श्रेष्ठ रत्नखाणी।।**

अशी ही कर्तृत्ववान गोरगरीबांची वाली अहिल्यादेवीने आपल्या जनतेला अन्न, वस्त्र मिळावं अशी तरतूद केली. दैनंदिन कारभार त्यांनी सामान्य जनतेला न्याय मिळणारा ठेवला. हुंडा देणे व सतीची चाल बंद व्हावी

असे त्यांचे विचार होते. त्यांची भेट सहज सर्वांना मिळे. त्या गोरगरीबांची गाऱ्हाणी, समस्या जाणून घेत व त्यांना न्याय देत. ह्याच उदाहरण म्हणजे एका गरीब विधवेला कारभाऱ्यांनी दत्तक घेण्यास परवानगी नामंजूर केली. अहिल्याबाईंनी परवानगी दिली. त्याला पोषाख दिला. अशा त्या लोकमाता होत्या. त्या दानधर्मावरील खर्च सरकारी तिजोरीतून करत नसत तर खाजगी उत्पन्नातून करत. निःस्वार्थ सेवाभावाच उत्तम उदाहरण कुठे सापडणार नाही. तसेच खरगोणचे तापीदास निपुत्रीक, तेव्हा ते आपली संपत्ती अहिल्याबाईंना देण्यास महेश्वरला आले. अहिल्याबाईने सांगितले की तुम्ही दानधर्म करून संपत्ती सत्कारणी लावा. गावी जाऊन मंदिर, घाट बांधा. प्रभावी व्यक्तीमत्त्वाची साक्ष देणाऱ्या ह्या सर्व गोष्टी खरोखर अतुलनीय आहेत. विद्वानांचा गौरव करीत.

'किती वर्णू तुझे कर्तृत्व अहिल्याबाई। थकली ही वाणी शब्द ओठी नाही', अशी अवस्था होते.

भारतामध्ये ज्या हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या कर्तबागार महिला होऊन गेल्या, त्यात सर्वात अग्रणी अहिल्याबाई. त्या केवळ कर्तबगार नव्हे तर सर्वगुण संपन्न होत्या. जनतेला त्यांच्याप्रती मोठाच आदर होता. म्हणूनच जनतेनी त्यांना कर्तृत्ववान, लोकमाता, पुण्यश्लोक पदवीने सन्मानीत केले.

धर्मनीष्ठ, कर्तव्यदक्ष, थोर प्रशासक, निःस्वार्थी, मुत्सदी, गोरगरिबांच्या वाली, परोपकारी अशा अहिल्याबाईंचे वयाच्या सत्तराव्या वर्षी निधन झाले. कवी मोरोपंत त्यांच्या विषयी म्हणतात की, तुम्ही धन्य झालात. कलियुगात तुमच्या सारखी त्यागी धर्मपरायण स्त्री दुसरी झाली नाही. धन्य ती पुण्यश्लोक, लोककल्याणी अहिल्याबाई.

या देवी सर्वभूतेषु शक्तीरुपेणस्थिता। नमस्तस्यै नमस्त्यौ नमो नमः।।

त्यांच्या कर्तृत्वाला त्रिवार वंदन.

## स्त्रीत्व

**विनया पुंडे** (मो. : ९९८७०७८९६६)

स्त्री म्हणजे साधना, स्त्री म्हणजे दया, करुणा, शांति, क्षमा, शमा, किर्ती, विद्या, समृद्धी, काली, दूर्गा, सरस्वती, समर्पिता, अर्पिता, कल्पना, माधुरी, विनया, प्रभा, उशा, रजनी, सृष्टी, श्रृति, वेदवती, चित्रा, रुपा, स्वरुपा, लक्ष्मी, श्रिया, यशदा.... किती म्हणून स्त्रीचे गुणवर्णन करावे, शब्द अपूरे पडतील. अशा सगळ्या गुणांचे अद्‌भूत रसायन स्त्री आहे! तीच्यासारख्या अनेक स्त्रियांचे आणि त्यांना पूर्णत्त्व देणाऱ्या पुरुषांचे सृजनत्त्वही तिच्याकडे आहे.

जितके गुण अधिक तितकी नम्रता अधिक. सद्‌गुणी, संत व्यक्ति अधिक नम्र असतात. नम्रता सहनशिलतेचा परिणाम आहे. सहनशील व्यक्ति नम्र राहू शकते. सहनशील व्यक्ति अधिक संवेदनशील असते. संवेदनेमधे अनुकंपा, सहानुभूति, दया, क्षमा, सद्‌भाव अंतर्निहित असतो. हेच तर सारे ज्ञान आहे. स्त्री मूळातच ज्ञानी आहे. म्हणूनच निसर्गाने तीला सृजनत्त्वाची जबाबदारी दिली आहे. त्यासाठी वात्सल्य, प्रेम, त्याग, समर्पण, बल, सातत्य, लवचिकता, भक्ति, श्रद्धा, संयम अनेक गुणांचे वरदान मिळाले आहे.

स्त्रीचे किती गुणवर्णन करावे? आपल्यामधेच सर्वकांही असतांना आपण पुरुषाची बरोबरी कां करावी? पुरुष आपला शतू आहे कां? त्याच्याशिवाय आपला ही जन्म शक्य आहे कां? तो जन्मदाता. तो पालनकर्ता पित्याच्या स्वरुपात आपल्याला लाभला आहे. आपण ऋणी असूं नये कां? तोच बंधूप्रेमाने आधारस्वरुप मैत्रीच्या नात्याने जीवनभर साथीला असतो. तोच पुरुष आपल्या तारुण्यसुलभ भावनांना पूर्णत्त्व आणण्यासाठी

खंबीरपणे एका सुरेख वळणावर आपल्या आयुष्यात येतो, आणि त्याच्या शिवाय मातृत्त्व, वात्सल्य, समर्पण, सृजनत्त्व आणि आनंद सहजीवन केवळ अशक्य आहे. विवाहानंतरच अत्युच्च भक्तिची पहिली पायरी मसमर्पणय करून स्त्री आपल्या जीवनाला सार्थक करते.

विवाहानंतर समर्पणानंतर मी नाव बदलणार नाही. माहेरचे पण आडनांव लावणार – मग तुमच्या मुलीनी, नातीनी किती नावे लावायची. पुढे पुढे आपलं नाव लिहायचे म्हणजे पुस्तकच लिहावे लागेल! ही समर्पणाची भावना नाही. आपल्या पूर्वजांवर श्रद्धा हवी, चालीरीतींना शास्त्राचा आधार आहे. अनुवंशिकतेने वडीलांकडून १४ पिढ्या व आईकडून ५ पिढ्यांचे आपण प्रतिनिधीत्त्व करत असतो. याला Genetic Science चा आधार आहे. म्हणून आपण वडीलांचे आडनाव लावतो. यात बरोबरी कसली? पित्याच्या कुलातील सद्‌गुण घेउन पतिच्या कुलाशी एकरुप होऊन आपण प्रजनन करून उत्तम मानव प्रजाति निर्माण करून कर्तव्यपूर्ति करत असतो. निसर्गाचे ऋण फेडत असतो. त्या आई होण्याचा अभिमान कसला? मातेबरोबरच बाळाचे संगोपन करण्यासाठी पित्याची तितकीच आवश्यकता असते. मुलावर आपला एकटीचा अधिकार – ते फक्त माझंच बाळ आहे असा हट्ट संपूर्ण अज्ञान व मूर्खपणा आहे.

भारतीय संस्कृतिमधे माहेरचा त्याग करून आपण नव्या कुटूंबाचा स्वतःहून स्विकार करतो. दुसऱ्याचा स्विकार जसे असेल तसे हा खूप मोठा अध्यात्मिक पाठ शिकण्याची सुरुवात व प्रगतिची दुसरी पायरी आपण चढतो. ती त्रासदायक होते, सहज नसते सासूला आई मानणं सोपं नसतं पण आपणहून ते स्विकारलेलं असतं. ती आपली प्रगति असते, कसोटी असते. आपल्या आईवडीलांचे प्रेम, कौतुक सगळ्यांनाच असते त्यात नवल ते काय? पण दुसऱ्या कुटूंबातील सद्‌गुण पहाणे, श्रद्धा ठेवणं आणि आपलं म्हणून स्विकार करणं व्यक्तिमत्त्वाच्या उन्नतिचे लक्षण आहे. भूतकाळात आसक्त न राहाता, पण कृतज्ञ राहून वर्तमानात प्रयत्नपूर्वक उज्ज्वल भविष्याची वाटचाल विवाह आहे!

माझे माता पिता, मामा मावशी, आजी, काका काकू, आत्या सगळ्यांबद्दल कृतज्ञता भाव आणि सासरच्या सगळ्याच नात्यांबद्दल कर्तव्य भाव, आदर, प्रेम, स्विकार स्त्रीच्या अंगभूत गुणांना सकाळी आणण्याची संधि आहे. किती युगे तेच घिसे पिटे विचार ष सासू दीर नणंद नवऱ्याची बरोबरी – रांधा वाडा उष्टी काढावी तक्रार – विभक्त कुटुंबाचा अट्टहास, मी माझं संकुचितता, स्वकेंद्री वृत्तीपासून आधुनिक स्त्री ला मुक्त होण्याची आवश्यकता आहे.

घराबाहेर पडणे, स्वतंत्र होणं, अर्धार्जनाची संधि मिळणं, एकत्र कुटुंबापासून विभक्त होणं, कार, विमान, रेल्वे, फायटर प्लेन, अवकाशात जाणं. सगळं तर सिद्ध झालं आहे. आतां कसला संघर्ष?

आता गरज आहे कठिण काळामधे मानवजात हे विश्व आपलं राष्ट्र, आपला समाज आणि आपले कुटूंब एकसंघ राखण्याची. एकीचे बळ आजमावण्याची आत्मियता, आपुलकी व प्रेम यांनी व्यक्ति-व्यक्ति व समाज धर्माला जोडून ठेवण्याची. धर्माचा खरा अर्थ सुशिक्षित स्त्री ने समजून घेण्याची.

आपल्या कुटुंबाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ सांभाळण्याची शुद्ध, सकस, पोषक आहार कुटूंबासाठी उपलब्ध करणे. भेसळयुक्त व्यापारात मोठे आव्हान आहे. त्यासाठी रसायनमुक्त शेतीपासून, गोपालन, प्रदूषणमुक्त हवा, पाणी यासाठी जागरुक क्रियाशील व्हायला हवे. आत्मनिर्भरतेसाठी मोठ्या आस्थापनांमधे नोकऱ्या शोधणारी पिढी निर्माण करण्यापेक्षा आपल्या कुटूंबाचे पिढ्यानपिढ्या चालत आलेले व्यवसाय कुशलतेचे पुनर्जिवन करण्याचा प्रयत्न व प्रेरणा एक स्त्रीच देउं शकते. त्यासाठी एकत्र कुटूंब असणाचा फार मोठा लाभ आहे. एकत्रित राहण्याने निसर्ग संपत्तिचा ऱ्हास थांबवला जाईल. निसर्ग मातेचं शोषण तातडीने थांबवण्याचा प्रयत्न एक स्त्री प्रभावीपणे करू शकते. पुढच्या पिढीपुढे येणाऱ्या आव्हानांचा विचार दूरदृष्टीने

आतांच करून योजकतेने सवयींमधे, विचारांमधे परिवर्तन घडवूं शकेल.

एकत्र कुटूंबाकडे पुन्हा वाटचाल, ज्येष्ठ व बालकांच्या समस्यांचे निराकरण, नोकरीची गुलामीची मानसिकता बदलून स्वतंत्र छोट्या व्यवसायांना प्रोत्साहन. आपले कुल, गोत्र, जात, परंपरा यांचे विचारपूर्वक जतन कुटूंबापासून सदाचार, सद्‌विचार, सहजीवन, आत्मियता यांची जोपासना, पुन्हा नैसर्गिक जीवनशैलीचे आचरण करून निसर्गाशी संतुलन म्हणजेच आरोग्य संपन्न समाज निर्मिती, भयमुक्त, आत्मनिर्भर, श्रद्धावान राष्ट्राच्या पुनरुत्यान कार्यामध्ये क्रियाशील हे आदर्श आहेत स्त्री शक्तिपूढे. ईश्वर तीला तिच्या कार्यामधे यश देवो.

## संलग्न संस्था वृत्त

**मुलुंड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था (मुलुंड) तर्फे 'दासनवमी' निमित्त 'दासबोध पारायण' सोमवार दि. ६-२-२०२३ ते बुधवार १५-२-२०२३ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. सोमवार दिनांक ६-२-२०२३ रोजी सकाळी ९ वाजता 'दासबोध' ग्रंथ पुजन त्यानिमित्त पंचोपचार पुजा श्री. नंदकुमार तांबवेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. रोज दुपारी २.३० ते ५ या कालावधीत पारायण होत असे.अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. ३५-४० साधक सहभागी झाले होते. रोज वाचन झाल्यावर आरती करून प्रसाद वाटप होत असे. पारायण दरम्यान प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी (१ ते ४ थी) स्पर्धा शुक्रवार दिनांक १०-२-२३ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. गट पहिला - (पहिली-दुसरी) - पाठांतर स्पर्धा - समर्थ रामदास स्वामी रचित दोन आरत्या १) खंडोबाची आरती २) मारुतीची आरती. या आरत्या श्रीमती सुरेखा संत यांनी उपलब्ध करून दिल्या.या गटांसाठी सौ.स्मिता देशपांडे व सौ अंजली पुरंदरे यांनी परीक्षक म्हणून काम केले.मुलांनी अतिशय सुंदर प्रकारे तालासुरात आरत्या म्हटल्या. गट दुसरा - (३-४थी)- चित्रकला स्पर्धा - विषय-रामायणातील एक प्रसंग. या गटासाठी सौ.अस्मिता वाळिंबे व कु.जयश्री कुलकर्णी यांनी परीक्षक म्हणून काम केले. मुलांनी खूप छान चित्रे काढली. बक्षिस वितरण समारंभ लगेचच करण्यात आला.त्याकरिता संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.भगवान आडगावकर, महिला शाखा अध्यक्ष डॉ.सौ.प्रेरणा क्षीरसागर, संस्थेचे खजिनदार श्री. प्रफुल्ल निमदेव व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.सर्व मुलांना वही व खाऊ देण्यात आला.परिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करतांना मुलांना प्रोत्साहन दिले. दासनवमीच्या दिवशी बुधवार दिनांक १५-२-२०२३ रोजी 'स्वराज्ञी भक्ती गीत मंडळ' यांचे भजन आयोजित केले होते.त्यांनी अतिशय सुंदर प्रकारे भजनं सादर केली.या कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. भजनाच्या कार्यक्रमानंतर प्रसाद वाटप करून पारायणाची सांगता झाली.

**कल्याण :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण आयोजित दास नवमी निमित्त गंथराज दासबोध या विषयावर आपले आजीव सदस्य हरिभक्त परायण श्रीमान अनंत ताठे यांचे प्रवचन श्री महालक्ष्मी मंदिर देवस्थान कल्याण पश्चिम येथे आयोजित करण्यात आले होते. श्रीमान ताठे यांनी दासबोधाचे महत्त्व, नवविधा भक्ती इतर विस्ताराने भाविकांन पुढे मांडल्या व या ग्रंथाचे वाचन कशा प्रकारे करावे याबद्दल माहिती दिली. त्यानंतर संस्था अध्यक्ष श्रीमान सुरेश कुळकर्णी यांच्या व इतर सदस्य/भाविकांच्या हस्ते श्री महालक्ष्मी देवीची सांय आरती करण्यात आली. त्यानंतर भाविकांना प्रसाद वाटप होऊन सांगता झाली यावेळी बहुसंख्येने संस्था पदाधिकारी, सदस्य व भाविक उपस्थित होते.

**मध्यवर्ती मंडळ :** १) मुंबई लघुवाद न्यायालयात सुरू असलेल्या भाडेकरू कोर्ट केस क्रमांक ३/१५ श्री राजेश जोशी यांच्या विरोधात मंडळाने विजय मिळविला आहे. श्री राजेश जोशी यांनी मंडळाच्या विरोधात आणि मा. कोर्टाच्या निर्णयाच्या विरोधात दोन वेळा अपील केले होते ते माननीय न्यायालयाने अखेर फेटाळून

लावले. मंडळाच्या ताब्यात आणखीन एक सदनिका प्राप्त झाली आहे.मा. कै. ॲड अनगळ यांचे मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्य मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री विलास जोशी कार्याध्यक्ष माननीय श्री प्रभाकर कुलकर्णी तसेच संस्थेचे व्यवस्थापक श्री विकास माने यांच्या अथक परिश्रमाचे हे यश आहे. ॲड. आनंद नायक, ॲड स्वेता नायक यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश. सर्वांचे मनापासून अभिनंदन.

२) दादर सांस्कृतिक मंच आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या सभागृहात माझी मराठी असे मायभाषा हा मराठी भाषा दिनानिमित्त मराठीचे गौरव वाढविण्याच्या निवडक साहित्याच्या अभिवाचनाचा बहारदार कार्यक्रमाचे आयोजन दि १ मार्च २०२३ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रसिद्ध अभिनेत्री मुग्धा गोडबोले, लेखक अभिराम भडकमकर, उत्तरा मोने आदी उपस्थित होते. वाचकांचा प्रचंड प्रतिसाद या कार्यक्रमास होता. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन मिलिंद सरदेशमुख यांनी केले.

**सोलापूर :** दि. १५ फेब्रुवारी २०२३ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षण शिक्षणोत्तजक संस्थेच्यावतीने 'जय जय रघुवीर समर्थ'च्या जयघोषात आणि ह. भ. प. रत्नप्रभा सहस्रबुद्धे यांच्या किर्तन सोहळ्याने दास नवमी साजरी करण्यात आली.

आपल्या कीर्तनाच्या पूर्वरंगांमध्ये त्यांनी 'नाम घ्या रे......' या अभंगावर निरूपण केले. या निरूपणात त्यांनी नाम घेण्याचे महत्त्व विशद केले. प्रत्येक व्यक्तीने नामस्मरण करणे महत्त्वाचे असून नामामुळे जीवन तरून जाते असे सांगितले. कीर्तनाच्या उत्तररंगात त्यांनी समर्थ रामदास स्वामी यांची शिष्य वेणास्वामी हिच्या कार्याची माहिती दिली. समर्थांनी एका महिलेला कीर्तन करण्याची संधी दिली तीच ही वेणास्वामी आहे. तिच्यामुळेच आज आमच्यासारख्या महिला किर्तनासाठी उभ्या राहिल्या आहेत, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, ह. भ. प. रत्नप्रभा सहस्रबुद्धे दत्ता आराध्ये, सतीश पाटील, विजय कुलकर्णी, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे आदींच्या हस्ते समर्थांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे उपाध्यक्ष शंकरराव कुलकर्णी आणि महिला अध्यक्षा हेमा चिंचोळकर यांच्या हस्ते ह.भ.प. सहस्रबुद्धे यांचा सत्कार करण्यात आला. मध्यंतरात विदुला कुलकर्णी यांनी सहस्रबुद्धे यांना हार अर्पण केला आणि आशीर्वाद घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता आराध्ये यांनी केले. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. समर्थ केटरर्स यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीपाद परळीकर पुरुषोत्तम कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले.

## भावपूर्ण श्रद्धांजली



बेळगाव येथील विविध संस्थांशी निगडित असलेले आणि समर्थ को-ऑपरेटिव्ह सोसायटी च्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावत असलेले पतसंस्थेचे उपाध्यक्ष, बेळगाव देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे कार्याध्यक्ष सुहास रामचंद्र कुलकर्णी (वय वर्षे ५९) यांचे दिनांक १०/२/२०२३ रोजी आकस्मिक निधन झाले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे. आपण सर्वजण एका सन्मित्र आणि संघटकास मुकलो आहोत. सार्वजनिक उपनयन, अनेक समाज उपयोगी कार्य तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत अशा अनेक कार्यामध्ये सुहास यांचा वाटा सिंहाचा होता. मध्यवर्ती संस्थेच्या सतत संपर्कात असलेले सुहास यांच्या अचानक जाण्याने मोठी हानी झाली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी विवाहित कन्या व एक मुलगा असा परिवार आहे. सुहास यांच्या आत्म्यास सद्गती लाभो अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

# जोडीदार निवडा

**वर पाहिजे**.......................................................................................................................

● नाव - **मानसी प्रविण गिरधर**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्म तारीख - २४.११.१९९६, गोत्र - वसिष्ठ, उंची - ५.१, वर्ण - गव्हाळ, शिक्षण - बी.पी.डी.एच., पत्रिका पाहायची आहे, व्यवसाय - डॉक्टर, रक्त गट - AB+, पत्ता - प्रविण भालचंद्र गिरधर, ६/क जपे चाळ, आर.आर. ठाकुर मार्ग, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०, संपर्क - ९७६९७६९११०.

**वधू पाहिजे**.......................................................................................................................

● नाव : **अनिकेत अतुल जोशी**, ब्राह्मण पोटशाखा - शुक्ल यजुर्वेदी, जन्मतारीख - २३.०१.१९९५, गोत्र - वत्स, वर्ण - गोरा, रक्तगट - A+, मंगळ - नाही, उंची - १६५ सेमी, बांधा - मध्यम, शिक्षण - १२ वी पास, नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) - समर्थ सहकारी बँकेत शिपाई पदावर कामाला, मासिक उत्पन्न रु. २०,०००/-, अपेक्षा - मुंबईत जॉब करून रहायला होकार असला पाहिजे, संपर्क - ९००४९६४७२१, ९८६७३२७०४१, पत्ता - के/३०४, सोनम गोदावरी, पी/६, ओल्ड गोल्डन नेस्ट, मीरा रोड (पू.)

● नाव - **प्रथमेश किशोर शेंदुणीकर**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - २४.०९.१९९२, गोत्र - अगस्ती, वर्ण - गोरा, नाडी- अंत्य, उंची - ५.९, बांधा - सडपातळ, शिक्षण - बीकॉम, एम.बी.ए. मार्केटींग, मासिक उत्पन्न रु. २०,०००/-, अपेक्षा - किमान पदवीधर, नोकरी करणारी किंवा तयार असणारी, संपर्क - ९४२३९७०४९७, पत्ता - तळमजला, अथर्व सहकारी गृह संस्था, भगवंत नगर, मुंबई नाका, नाशिक ४२२००९.

● नाव - **योगेश विनयकुमार देशपांडे**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - २०.०८.१९९१, गोत्र - गौतम, वर्ण - गोरा, रक्तगट - B+ve, नाडी - आद्य, उंची - ५.५, बांधा - सडपातळ, शिक्षण - डिप्लोमा-इन-ऑटोमोबाईल इंजिनिअरींग, वार्षिक उत्पन्न रु. ४ लाख, अपेक्षा - प्रथम वधु, उंची ५ ते ५.४ वय २७ ते ३० मध्ये, अनुरुप, शिक्षणाची अट नाही, नोकरी करणारी किंवा करण्याची तयारी असावी, संपर्क - विलास देशपांडे ९४२३५८२५१६, पत्ता - चाफेकर चौक, चिंचवड, पुणे.

● नाव - **श्रेयस प्रमोद आचार्य**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्म तारीख - ०७.०७.१९९४, गोत्र - काश्यप, उंची - ५.९, वर्ण - गोरा, शिक्षण - M.E. सॉफ्टवेअर., पत्रिका पाहायची आहे, अपेक्षा - पदवीधर, नोकरी करणारी, मनमिळावू, व्यवसाय - U.K. base CTC, रक्त गट - AB+, पत्ता - प्रमोद मुकुंद आचार्य, २सी/१७०७ धीरज होम्स्, पवार पब्लिक स्कुल समोर, एल.बी.एस. रोड, भांडुप (पश्चिम), मुंबई-४०००७८, संपर्क - ९८६९२३३२३२.

● नाव - **ओंकार बाळकृष्ण पुजारी**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्म तारीख - १६.०५.१९८९, गोत्र - भारद्वाज, उंची - ५.५, वर्ण - गोरा, शिक्षण - इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर, पत्रिका पाहायची आहे, अपेक्षा - पदवीधर, नोकरी करणारी, मनमिळावू व मोकळ्या स्वभावाची, व्यवसाय - U.K. base CTC, रक्त गट - B+, पत्ता - बाळकृष्ण पुजारी, ३०३, वेदांत बिल्डींग नं.१, पी ॲण्ड् टी कॉलनी, डोंबिवली (पूर्व), संपर्क - ९८१९०६८१३५.

(**टीप** : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील.)


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील**

**खालील मंगल कार्यालये**

**तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**



MRH

painttech
CONSULTANTS

Generations Technology Changes BUT HULYALKAR SAME

**Mukund R. Hulyalkar**

Visits:
**By Appointment Only**
Available on Phone
9.00 a.m. to 6.00 p.m. (For local)
10.30 p.m. to 11.30 p.m. (For outstation)

**Acrylic Distemper**
**2**
**Zinc Silicate**

**Complete Paint World**
**"Choice of Bright People"**

NATIONALIST CONGRESS PARTY
**Mukund R. Hulyalkar — Paint Technologist**
Vice-President: South Central Mumbai Dist

| | | |
|---|---|---|
| **Hon. Editor** | : | Paint India |
| ***Secretary*** | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| **President** | : | Deshastha Rugvedi Brahman Sangha, Dadar |
| ***I P President*** | | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| ***Patron Member*** | : | Winner's Academy - Thane |
| ***Member*** | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| ***Award*** | : | ISSPA Mitra Award (2012) |
| | | Udyogshree By Maharashtra State Government |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile: 9821099494 • Tel.: 022-24456214 • Fax.: 022-24314865
E-mail: painttech_con@yahoo.com • Website: www.painttechconsultants.com


FE INDIA'S BEST BANKS AWARDS
IndusInd Bank has been adjudged the winner in the category of 'Best Savings Product' at the FE Best Banks Awards 2020-21.
IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates
on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF*
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE*
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.

*Best wishes from*

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH
## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELAGAVI.

**HEAD OFFICE :**
"Samarth Sadan", Gurukrupa complex,
1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI - 01.
Phone : 0831-2431357, 2403968
e-mail : samarthsociety@yahoo.com
Website : www.samarthsociety.co.in

**R C NAGAR BRANCH :**
"Bhagirathi" R.S. No. 731/D-2,
'C' Scheme, Channamma Nagar,
Main Road, BELAGAVI - 06.
Phone : 0831-2443161

**TILAKWADI BRANCH :**
"Classic Plaza" CTS 44/A2,
Somwarpeth, Tilakwadi,
BELAGAVI - 06.
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH :**
CTS 1103, 1st Floor,
Bichu Galli, Shahapur,
BELAGAVI - 03.
Phone : 0831-2431257

**KHANAPUR BRANCH :**
1524/A6, Mannerikar Building,
Beside State Bank,
Belagavi-Goa Road, KHANAPUR.
Mob. : 6363090655

## UNIQUE DEPOSIT SCHEME WITH ATTRACTIVE RATE OF INTEREST

### AKSHAY DEPOSIT

| | | | Regular | For Senior Citizen |
|---|---|---|---|---|
| 1) | 46 days to 180 days | ... | 6.00% p.a. | -- |
| 2) | 181 days to 364 days | ... | 6.50 p.a. | -- |
| 3) | 1 Year | ... | 8.00% p.a. | 9.00% p.a. |
| 4) | 2 Years | ... | 9.00% p.a. | 10.00% p.a. |
| 5) | 3 Years | ... | 10.00% p.a. | 11.00% p.a. |

**KALPATARU DEPOSIT : Double in 84 Months**

**GOLD LOAN 12.00% p.a.**

### LOAN SCHEMES

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Personal Security Loan | ... | 16.00% p.a. |
| 2) | Mortgage / Hypothecation / Business / Cash Credit / Govt. Security / Education Loan | | |
| | * Up to Rs. 10 Lakhs | ... | 14.25% p.a. |
| | * Above Rs. 10 Lakhs & upto Rs. 25 Lakhs | ... | 14.50% p.a. |
| | * Above Rs. 25 Lakhs upto Rs. 50 Lakhs & Above | ... | 15.00% p.a. |

### NIRANTAR (Recurring Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 1 Year | 8.00% p.a. |
| 2) | 2 Years | 9.00% p.a. |
| 3) | 3 Years | 10.00 p.a. |

### MADHU SANCHAY (Pigmy Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 6 Months | 3.00% p.a. |
| 2) | 1 Year | 4.00% p.a. |



**Ajay A. Sunalkar**
Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni
Abhay V. Joshi
Sou. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh Sunagar
Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Sou. Chaya N. Joshi
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri



**Suhas R. Kulkarni**
Vice Chairman

Arvind S. Kulkarni (Secretary)

Raghavendra S. Kesnur (Gen. Manager)

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




बीबीएनजी राष्ट्रीय परिषदेतर्फे श्री. विलास जोशी यांना जीवनगौरव पुरस्कार मा. देवेन्द्र फडणवीस, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान



महिला दिन सोहळा २०२३

Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH